
# प्रशासकीय अहवाल
# (२०१७ - २०१८)



## बाष्पके संचालनालय

महाराष्ट्र राज्य
मुंबई -५१

| अ.क्र. | विषयाचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना. | १ |
| २ | या विभागाच्या अधिनस्त असलेले अधिनियम, नियम व विनियम. | १ |
| ३ | बाष्पके संचालनालयाचे मिशन. | २ |
| ४ | बाष्पके संचालनालयाचा दृष्टीकोन. | २ |
| ५ | बाष्पके विभागाची विभागवार माहिती. | २ |
| ६ | या विभागामार्फत देण्यात येणाऱ्या महत्वाच्या सेवा. | ४ |
| ७ | बाष्पके संचालनालयतर्गत महत्वाचे धोरणात्मक बाबींवर घेतलेले निर्णय. | ४ |
| | १ स्वयं प्रमाणिकीकरण नि एकत्रितकृत वार्षिक विवरण योजना. | |
| | २ त्रयस्थ आस्थापनामार्फत निरीक्षण योजना. | |
| | ३ सेवा हमी अधिनियम, २०१५. | |
| ८ | बाष्पक नोंदणी. | ६ |
| ९ | प्रमाणपत्रांचे नुतनीकरण. | ६ |
| १० | नैमित्तिक बाहय निरीक्षण व नवीन बाष्पकांची नोंदणी बाष्पदाब चाचणी. | ९ |
| ११ | मितीपयोजकांचे नोंदणी निरीक्षण व नियतकालिक निरीक्षण. | ९ |
| १२ | स्टीम,फीड व ब्लो डाऊन नलिकांचे निरीक्षण. | १० |
| १३ | बाष्पक निर्मिती. | १० |
| १४ | माऊंटिंग्ज,फिटिंग्ज इत्यादीची माहिती. | १० |
| १५ | माऊंटिंग/फिटिंग्ज आकारमान मि.मि. मध्ये. | ११ |
| १६ | बाष्पक परिचर व बाष्पक परिचालन अभियंता परीक्षा. | ११ |
| १७ | जमा व खर्चाचे विवरण पत्र. | १२ |
| १८ | अपघात. | १२ |
| १९ | विशेष बाबी. | १३ |
| २० | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ अंतर्गत ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यांत आलेल्या लोकसेवा. | १४ |
| २१ | महाराष्ट्र शासनाच्या मेक इन महाराष्ट्र या योजनेअंतर्गत ईझ ऑफ डुईंग बिझिनेस साध्य करण्यांकरीता या संचालनालयाने बाष्पक वापरकर्त्यांसाठी उपलब्ध करुन दिलेल्या योजना. | १४ |
| २२ | सन २०१७ या वर्षामध्ये वृक्षारोपणाचा कार्यक्रम. | १५ |
| २३ | बाष्पके संचालनालय एक दृष्टीक्षेप. | १५ |
| | | |

## बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र बाष्पक नियम,१९६२ मधील नियम क्र. ५ अनुसार
बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र राज्याचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा प्रशासकीय अहवाल.

### १ प्रस्तावना :-

बाष्पक हा शब्द बॉयलर या अर्थाने सामान्य जनतेला ज्ञात आहे. बाष्पक हे उपकरण पाण्यापासून वाफ निर्माण करते. या वाफेच्या दाबावर मोठमोठी यंत्रे गतिमान होतात. हा विभाग गेली १४६ वर्षे यशस्वीरित्या काम करत आहे. सायझिंग, तेल गिरण्या, कापड गिरण्या, रासायनिक कारखाने, खत निर्मिती कारखाने, पेट्रोलजन्य उत्पादने, प्रक्रिया कारखाने, साखर कारखाने व ऊर्जा निर्मिती कारखाने (पॉवर स्टेशन्स) अशा लहानमोठया उद्योगांमध्ये बाष्पकाची गरज असते. हे यंत्र जसे अतिशय उपयुक्त आहे तसेच ते अत्यंत स्फोटक व धोकादायक आहे. अपघात झाल्यास जिवित व वित्त हानी मोठया प्रमाणावर होऊ शकते. १८६९ साली मुंबई शहरात बाष्पकामुळे दोन भीषण अपघात झाले. त्यामध्ये जिवित व वित्त हानी मोठया प्रमाणावर झाली, त्याच वर्षी म्हणजेच सन १८६९ साली मुंबई राज्याच्या बाष्पक विभागाची स्थापना झाली. पुढे भारतीय बाष्पक अधिनियम, १९२३ हा कायदा राष्ट्रीय स्तरावर अस्तित्वात आला. बाष्पकाचे संकल्पचित्र, विनिर्देश प्रमाणपत्र, रेखाचित्र आणि बाष्पकाची निर्मिती, नोंदणी व निरीक्षण इ. बाबतचे विनियम अंतर्भूत केलेला भारत सरकारचा भारतीय बाष्पके विनियम, १९५० अस्तित्वात आला. त्यानंतर अधिनियमाच्या आधारे महाराष्ट्र बाष्पक नियम, १९६२ व महाराष्ट्र मितीपयोजक नियम, १९६५ हे अस्तित्वात आले. भारतीय बाष्पके अधिनियम, इ.स.२००७ मध्ये सुधारित होऊन, बाष्पके अधिनियम १९२३ असा करण्यात आला. नंतर मार्च-२०११ मध्ये बाष्पक परीचालन अभियंता नियम २०११ व बाष्पक परिचर नियम २०११" असे अस्तित्वात आले.

महाराष्ट्र राज्य हे बाष्पक उत्पादन क्षेत्रात अग्रगण्य राज्य आहे.या संचालनालयाचे अधिकारी बाष्पकाची तपासणी अतिशय काटेकोरपणे व कायद्यातील नियमानुसार कार्यक्षेमतेने पार पाडून जिवित व मालमत्तेची सुरक्षा करतात. यामुळेच या राज्यामध्ये अनेक वर्षात बाष्पकांना कोणताही मोठा अपघात होऊन त्यामध्ये वित्त व जिवितहानी झालेली नाही.

ध्येय, उद्दीष्टे व सामाजिक बांधिलकीः राष्ट्रहिताच्या दृष्टीने मनुष्यबळ व राष्ट्राची संपत्ती याचे अपघातापासून संरक्षण व जतन करणे आणि राष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीस अधिक गतिमान करण्यामध्ये हातभार लावणे.

जनतेचा हक्क : उद्योजकांस उद्योगधंद्यायाच्या उत्कर्षासाठी व उत्पादनासाठी बाष्पक यंत्रासारखे अत्यंत धोकादायक व स्फोटक परंतु अत्यंत उपयोगी यंत्र खरेदी करणे व त्याचा नियमानुसार वापर करण्याचा हक्क आहे.

सदर बाष्पक जसे अत्यंत उपयोगी आहे तसेच ते स्फोटक व धोकादायक आहे. त्यास अपघात झाल्यास मोठया प्रमाणावर जिवित व वित्त हानी होऊ शकते. त्यामुळे जनतेचे व राष्ट्राचे नुकसान होऊ शकते. म्हणूनच ते नियमानुसार वापरले पाहिजे.

### २ या विभागाच्या अधिनस्त असलेले अधिनियम, नियम व विनियम

- बाष्पके अधिनियम, १९२३
- भारतीय बाष्पके विनियम, १९५०
- महाराष्ट्र बाष्पक नियम, १९६२
- महाराष्ट्र मितीपयोजक नियम, १९६५
- बाष्पक परीचालन अभियंता नियम २०११
- बाष्पक परिचर नियम २०११

## ३ बाष्पके संचालनालयाचे मिशन :-

- बाष्पकाच्या सुरक्षेच्या वापरात असलेल्या बाष्पकाची काटेकोरपणे तपासणी आणि जिवीत व मालमत्तेचे बाष्पक स्फोटांपासून संरक्षण करणे.
- राष्ट्रीय विकासाच्या वृध्दी करीता, बाष्पकांचे उत्पादना दरम्यान दर्जेदार निरीक्षण करणे
- बाष्पकांच्या सुरक्षित वापराकरीता बाष्पक परिचर आणि परिचालन अभियंत्यांची परीक्षा घेऊन सक्षम मनुष्यबळ तयार करणे.
- गतिमान, पारदर्शक सार्वजनिक देय व्यवस्थेच्या वचनबध्दतेसाठी, प्रक्रियांचे सुलभीकरण आणि संगणकासह आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करणे.
- बाष्पक आणि प्रेशर व्हेसल्स यांची निर्मिती, तपासणी आणि अपघातांचे विश्लेषण या क्षेत्रांमध्ये अग्रगण्य निरीक्षण संस्था असे श्रेष्ठत्व जोपासण्याकरीता, आंतरराष्ट्रीय संस्थांशी बरोबरी करणे.
- सुपर क्रिटीकल बाष्पकांची निर्मिती/निरीक्षण या क्षेत्राामध्ये आधुनिक पध्दतींचा विकास करणे.
- सौर उर्जेवर चालणाऱ्या बाष्पकांची निर्मिती करणाऱ्या संस्थांना मदत आणि प्रोत्साहन देणे.
- बाष्पक संबंधी समूहामध्ये बाष्पकाच्या सुरक्षित आणि सक्षमपणे वापराकरीता जनजागृती निर्माण करणे.

## ४ बाष्पके संचालनालयाचा दृष्टीकोन :-

आधुनिक काळाबरोबर बदललेल्या जागतिक तंत्रज्ञानामुळे होणाऱ्या सुधारणा हया विभागाने अवलंबिल्या आहेत. हा विभाग सर्व कामे आद्यापावेतो प्रचलित पध्दतींने करीत आहे. तथापी हया विभागाची भविष्यातील दृष्टी खालीलप्रमाणे आहे.

- विभागाचे संपूर्ण संगणकीकरण
- सुधारीत सक्रिय संकेतस्थळाचे जाळे
- नागरीक सेवा पुरविण्यासाठी तात्कालीक पध्दतीचे सुलभीकरण आणि पारदर्शकतेची जोपासना करणे.
- नागरीकांच्या तक्रारी / सुचना प्राप्त करण्याकरीता व्यवस्थेचा विकास करणे.
- नागरीकांची मते आजमावण्याकरीता व्यवस्थेचा विकास करणे
- बाष्पक व प्रेशर व्हेसल निर्मीती, तपासणी आणि अपघाताचे विश्लेषण या क्षेत्रामध्ये अग्रगण्य निरीक्षण संस्था असे श्रेष्ठत्व जोपासण्याकरीता, आंतरराष्ट्रीय संस्थांशी बरोबरी करण्याच्या उद्दीष्टांकरीता आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करणे
- सुपर क्रिटीकल बाष्पक, ज्यामध्ये बाष्पक व पाणी यांची घनता समान असते, अशा बाष्पकांचे उत्पादन, उभारणी, नोंदणी व तपासणीकरीता तंत्राचा विकास करणे.
- अपारंपारीक उर्जेच्या वापराला प्रोत्साहन देऊन सौर उर्जेवर चालणारे बाष्पक उत्पादन करणाऱ्या संस्थांना मदत व प्रोत्साहन देणे.
- बाष्पक अधिनियम, १९२३ आणि त्यामधील सुधारणा संबंधी जनजागृतीसाठी प्रादेशिक कार्यालयांमध्ये जनजागृती उपक्रम राबवणे.
- बाष्पके निर्मात्यांना अपारंपारीक ऊर्जा स्त्रोत आधारीत बाष्पकांची निर्मिती करण्यास प्रोत्साहन देणे व बाष्पक वापरकर्त्यांना अशा प्रकारची बाष्पके घेण्यास प्रोत्साहन देऊन जनजागृती अभियान राबविणे.

## ५ बाष्पके विभागाची विभागवार माहिती:-

बाष्पके संचालनालयाचे मुख्यालय हे मुंबई येथे असून बाष्पके संचालक हे कार्यालय प्रमूख आहेत. या संचालनालयाच्या अधिपत्याखाली ६ विभागीय कार्यालये असून त्या विभागाच्या अंतर्गत येणारे कार्यक्षेत्र खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कार्यालयाचा पत्ता व दूरध्वनी | प्रमुख अधिकारा | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | **बाष्पके संचालनालय,**<br>कामगार भवन, सातवा मजला, भूखंड क्रं.सी-२०, ब्लॉक-ई,<br>बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.<br>दूरध्वनी : ०२२-२६५७११९८/२६५७१३५२/२६५७१३०४.<br>फॅक्स : ०२२-२६५७१२८३.<br>e-mail ID : dirsb.mumbai@maharashtra.gov.in | संचालक,<br>(विभाग प्रमुख) | महाराष्ट्र राज्य तसेच बृहमुंबई, ठाणे, पालघर व रायगड. |
| २ | **सहसंचालक, बाष्पके,**<br>सहकार भवन, पहिला मजला, आदर्श नगर, पुणे सातारा रोड,<br>पुणे : ४११०३७.<br>दूरध्वनी :०२०-२४२६१६९७.<br>e-mail ID : jtdirsb.pune@maharashtra.gov.in | सहसंचालक,<br>(प्रादेशिक प्रमुख) | पुणे व सातारा |
| ३ | **सहसंचालक, बाष्पके,**<br>१, भगवा घर ले आऊट, धरमपेठ, नागपूर -४४० ०१०<br>दूरध्वनी :०७१२-२५३११७०.<br>e-mail ID : jtdirsb.nagpur@maharashtra.gov.in | सहसंचालक,<br>(प्रादेशिक प्रमुख) | नागपूर, बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदीया, आणि वाशिम. |
| ४ | **सहसंचालक, बाष्पके,**<br>हरेश, २१६ बिजली को. ऑ. हौ. सोसायटी, शिला विहारजवळ,<br>वसंत टेकडी, अहमदनगर-४१४ ००३.<br>दूरध्वनी : ०२४१-२४२१७४५.<br>e-mail ID : jtdirsb.ahmednagar@maharashtra.gov.in | सहसंचालक,<br>(प्रादेशिक प्रमुख) | अहमदनगर, औरंगाबाद, जालना, हिंगोली, बीड आणि परभणी |
| ५ | **सहसंचालक, बाष्पके,**<br>४, उद्योग भवन, तळमजला,<br>त्रंबक रोड, सातपूर, नाशिक-४२२ ००७.<br>दूरध्वनी : ०२५३-२३५१०१६.<br>e-mail ID : jtdirsb.nashik@maharashtra.gov.in | सहसंचालक,<br>(प्रादेशिक प्रमुख) | नाशिक, धुळे, नंदूरबार आणि जळगांव |
| ६ | **सहसंचालक, बाष्पके,**<br>जुना राजवाडा, भवानी मंडप,<br>कोल्हापूर - ४१६ ०१२.<br>दूरध्वनी : ०२३१-२५२२९२०.<br>e-mail ID : jtdirsb.kolhapur@maharashtra.gov.in | सहसंचालक,<br>(प्रादेशिक प्रमुख) | सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी |
| ७ | **सहसंचालक, बाष्पके,**<br>वीतराग व्हर्टेक्स, पहिला मजला, नवल पेट्रोल पंपासमोर, ८३-ए,<br>रेल्वे लाईन्स, डफरीन चौक, सोलापूर :४१३ ००१<br>दूरध्वनी : ०२१७-२३१७०१५.<br>e-mail ID : jtdirsb.solapur@maharashtra.gov.in | सहसंचालक,<br>(प्रादेशिक प्रमुख) | सोलापूर, उस्मानाबाद, लातूर आणि नांदेड |

## ६ या विभागामार्फत देण्यात येणाऱ्या महत्वाच्या सेवा

- बाष्पक/लहान स्वरुपातील औद्योगिक बाष्पक / मितोपयोजक यांचे नोंदणी निरीक्षण
- वॉटर टयूब बाष्पकाचे/स्टील टयूब मितोपयोजकाचे नोदणी निरीक्षण
- बाष्पक/लहान स्वरुपातील औद्योगिक बाष्पक/मितोपयोजक यांचे निरीक्षण
- बाष्पक/मितोपयोजकांस अपघात झाल्यास चौकशी करणे
- बाष्पकाच्या प्रमाणपत्राची नक्कल प्रत
- मालकी हक्काचे हस्तांतरण
- बाष्पक मालकाने किंवा कंत्राटदाराने नवीन प्रकल्पातंर्गत नवीन पाईप लाइनची जोडणी / उभारणी तसेच जुन्या पाईपलाईनची दुरुस्ती किंवा बदली करणे
- बाष्पक, लहान औद्योगिक बाष्पक, मितोपयोजक व त्यांचे सुटे भाग, हिट एक्सचेंजर, प्रेशर व्हेसल यांची निर्मिती.
- कास्टींगची निर्मिती.
- फोर्जिगंची निर्मिती.
- व्हॉल्वज/माऊटिंग्ज/फिटींग्ज निर्मिती
- सांध्यात्याची ( वेल्डर ) चाचणी व पुनर्चाचणी.
- वेल्डींग इलेक्ट्रोडची आरंभीची (Initial Qualification test )/नियतकालीक चांचणी (Periodical test )
- बाष्पक / मितोपयोजक व त्याचे सुटे भाग यांची निर्मिती / दुरुस्ती, बाष्पकांच्या भागांची उभारणी, चाचणी प्रयोगशाळा, पाईप/टयूब, फाउंड्री, फोर्ज शॉप, झडपा, फिटींग, वेल्डिंग इलेक्ट्रोड यांचे निर्माते तसेच पाईप फॅब्रिकेटर वगैरेच्या
  कार्यशाळेस मान्यता व त्याचे वार्षिक नुतनीकरण.
- बाष्पक परिचालन अभियंता परीक्षा
- प्रथम वर्ग बाष्पक परिचर परीक्षा
- व्दितीय वर्ग बाष्पक परिचर परीक्षा
- पृष्ठांकन व नक्कल प्रत

## ७ बाष्पके संचालनालयांतर्गत महत्वाच्या धोरणात्मक बाबींवर घेतलेले निर्णय.

देशातील उदयोगामध्ये उदयोगशील वातावरण निर्माण व्हावे यासाठी राष्ट्रीय स्तरावर मेक इन इंडिया ही संकल्पना राबविण्यात येत असून महाराष्ट्र राज्यात या धर्तीवर मेक इन महाराष्ट्र चे धोरण जाहीर झालेले आहे. त्यानुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेले आहेत.

### १. स्वयं प्रमाणिकरण निएकत्रीकृत वार्षिक विवरण योजना.

मेक इन इंडिया आणि उद्योगस्नेही वातावरण (ईज ऑफ डुईंग बिझिनेस) यासारख्या भारत सरकारच्या धोरणांच्या अनुषंगाने राज्यामध्ये उत्तम सेवा देण्यासाठी, महाराष्ट्र शासनाच्या बाष्पके संचालनालयाच्या विविध अधिनियम व नियम इत्यादींमध्ये सुसूत्रीकरण व सुलभीकरण करुन, उद्योग क्षेत्रात अधिक पोषक वातावरण निर्माण होईल आणि उद्योगामध्ये कार्यरत कामगारांची सुरक्षा व सुरक्षितता यामध्ये तडजोड न करता मेक इन महाराष्ट्र या संकल्पनेला अधिक चालना देण्याकरिता महाराष्ट् शासनाने, १००० वर्ग मीटर पेक्षा अधिक किंवा तितके तपनक्षमता असलेले बाष्पक व मितोपयोजक यांच्याकरिता स्वयं प्रमाणिकरण निएकत्रीकृत वार्षिक विवरण योजना सुरु करण्याचा निर्णय, शासन निर्णय, क्रमांकः बाष्पके-०४१५/प्र.क्र.२३/कामगार-१, दिनांक २४/०६/२०१५ व्दारे घेण्यात आला आहे.

बाष्पके संचालनालयाच्या स्वयं प्रमाणिकरण योजने अंतर्गत राज्यस्तरीय स्वयं प्रमाणिकीकरण समिती या विभागाचा कार्यालयीन आदेश क्रमांकः३८/२०१५, दिनांक १९/०९/२०१५ व्दारे स्थापन करण्यात आली आहे व सदर समिती खालील प्रमाणे आहे.

## २. त्रयस्थ आस्थापनांमार्फत निरीक्षण योजना

मेक इन इंडिया आणि उद्योगस्नेही वातावरण ( ईज ऑफ डुईंग बिझिनेस) यासारख्या भारत सरकारच्या धोरणांच्या अनुषंगाने राज्यामध्ये उत्तम सेवा देण्यासाठी, महाराष्ट्र शासनाच्या बाष्पके संचालनालयाच्या विविध अधिनियम व नियम इत्यादींमध्ये सुसूत्रीकरण व सुलभीकरण करुन उद्योग क्षेत्रात अधिक पोषक वातावरण निर्माण होईल आणि उद्योगामध्ये कार्यरत कामगारांची सुरक्षा व सुरक्षितता यामध्ये तडजोड न करता मेक इन महाराष्ट्र या संकल्पनेला अधिक चालना देण्याकरिता महाराष्ट्र शासनाने, १००० वर्ग मीटर पेक्षा कमी तपनक्षमता असलेले बाष्पक व मितोपयोजक यांच्याकरिता **त्रयस्थ आस्थापनांमार्फत निरीक्षण (TPI)** योजना सुरु करण्याचा निर्णय, शासन निर्णय, क्रमांकः एफ.ए.सी.-२०१५प्र.क्र.३१७ कामगार-४, दिनांक १७-०३-२०१६ व्दारे घेण्यात आला आहे.

## ३. सेवा हमी अधिनियम, २०१५

राज्यामध्ये नागरीकांना शासनाकडून देण्यात येणाऱ्या सेवा सुविधा यामध्ये गतिमानता व पारदर्शिका देऊन प्रस्तावित अधिनियम, नियमांच्या अंतर्गत सेवांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासकीय व वित्तीय अधिकारांचे विकेंद्रीकरण, निर्णय घेण्याचे स्तर कमी करणे, कार्यपध्दतीचे सुलभीकरण करणे यासारखी कार्यवाही होऊन नागरीकांना देण्यात येणाऱ्या सेवा सुविधा सुलभ करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने राज्यामध्ये सेवा हमी अधिनियम, २०१५ लागू केलेला आहे.

## ८ बाष्पक नोंदणी

अहवाल कालावधीत महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण २५० नवीन बाष्पकांची नोंदणी झाली. यामध्ये ३३ लघु औद्योगिक बाष्पकांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्यातून २९ बाष्पके निरनिराळया राज्यात स्थानांतर होऊन गेली. तर २२ बाष्पके निरनिराळया राज्यातून या राज्यात स्थांनातरीत होऊन आली.

## ९ प्रमाणपत्रांचे नुतनीकरण

सन २०१७-२०१८ या वर्षात ४२९६ बाष्पकांची प्रमाणपत्राच्या नुतनीकरणासाठी निरीक्षणे करण्यात आली. यापैकी पुढील वापरासाठी योग्य ठरवून ४१७३ बाष्पकांना प्रमाणपत्र देण्यांत आली त्यामध्ये भारतीय सेनादलाच्या मालकीच्या १४ बाष्पकांचा समावेश आहे व अधिनियमातून सूट देण्यांत देण्यांत आलेल्या ६ बाष्पकांचा समावेश आहे. तसेच ११८ बाष्पकांना अल्प मुदतीचे प्रमाणपत्रे देण्यांत आली. प्रमाणित केलेल्या ४१७३ बाष्पकांपैकी ६२४ बाष्पकांना आवश्यक तेथे दुरुस्त्या करण्यांत आल्या. ३२ बाष्पकांच्या बाबतीत बाष्पक मालकांनी पुढील निरीक्षण व जलदाब चाचणीसाठी सादर न केल्यामुळे, प्रमाणपत्रे निर्गमित करण्यांत आलेली नाहीत.

चालू वर्षात व मागील दोन वर्षाच्या कालावधीत प्रमाणपत्रे देण्यात आलेल्या बाष्पकांची विभागवार संख्या खालील तक्त्यात दर्शविलेली आहे.

| अ.क्र. | पदनाम | पद |
|---|---|---|
| ०१ | संचालक | अध्यक्ष |
| ०२ | जेष्ठ उपसंचालक, मुंबई | सचिव |
| ०३ | सह संचालक, पुणे | सदस्य |
| ०४ | सह संचालक, नागपूर | सदस्य |
| ०५ | सह संचालक, अहमदनगर | सदस्य |
| ०६ | सह संचालक, कोल्हापूर | सदस्य |
| ०७ | सह संचालक, नाशिक | सदस्य |
| ०८ | सह संचालक, सोलापूर | सदस्य |

| वर्ष | बृहन्मुंबई रायगड, पालघर व ठाणे | पुणे | नाशिक | नागपूर | सोलापूर | अहमदनगर | कोल्हापूर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१५-२०१६ | १२६३ | ५४१ | ३९१ | ४७६ | २०१ | ३३९ | ५९८ | ३८०९ |
| २०१६-२०१७ | १२५३ | ५७५ | ४०३ | ४६२ | १९० | ३९२ | ५९८ | ३८७३ |
| २०१७-२०१८ | १२६८ | ६०७ | ४१५ | ६०८ | २०९ | ३९१ | ६७५ | ४१७३ |

- नवीन बाष्पकांच्या बाबतीत नोंदणी केल्यानंतर ते चालवण्याकरीता देण्यात आलेल्या तात्पुरत्या आदेशांची संख्या ७६६ आहे.
- अहवाल कालावधीत आणि मागील २ वर्षात निरीक्षण करुन प्रमाणित केलल्या निरनिराळया प्रकारच्या बाष्पकांची आकडेवारी खालील प्रमाणे आहे.

| क्रमांक | बाष्पकांचे प्रकार | २०१५-२०१६ | २०१६-२०१७ | २०१७-२०१८ |
|---|---|---|---|---|
| ०१ | स्मॉल इंडस्ट्रियल बॉयलर | १०२ | ११७ | २२७ |
| ०२. | हॉरिझॉन्टल (स्मोक टयुब) पॅकेज बॉयलर | २२८९ | २२१८ | २४०७ |
| ०३. | कंपोझिट | २५४ | २११ | ३४६ |
| ०४. | वॉटर टयुब (युटीलिटी वगळून) | ७६४ | ८१९ | ८७७ |
| ०५. | वेस्ट हिट | २४३ | २१० | १७३ |
| ०६. | थर्मीक फ्लुयीड हिटेड स्टिम जनरेटर | ६ | ६ | ६ |
| ०७. | युटीलिटी (ऊर्जा निर्मिती क्रेंद्रातील) | ३१ | ४० | ३१ |
| ०८. | सुपर लँकेशायर/लँकेशायर/कोचरन | २२ | ३४ | ३ |
| ०९. | कॉर्निश/मरिन | १७ | ९० | ४ |
| १०. | लोकोमोटीव्ह | १२ | ३ | ३ |
| ११. | व्हर्टिकल(क्रॉस टयुब) | ४७ | ८५ | ७७ |
| १२. | इलेक्ट्रोड | ११ | ९ | ६ |
| १३. | कॉईल टाईप फोर्सड सर्क्यूलेशन (एसआयबी वगळून) | ११ | ३१ | १३ |
| **एकूण** | | **३८०९** | **३८७३** | **४१७३** |

- अहवालांकित वर्षात व मागील २ वर्षात निरीक्षण करुन प्रमाणित केलेल्या निरनिराळया तपनक्षमतेच्या बाष्पकांचा तपशिल खाली दिलाआहे. बाष्पकांची तपनक्षमता चौरस मिटरमध्ये व संख्या खालीलप्रमाणे आहेत.

| क्रमांक | बाष्पकांचे प्रकार | २०१५-२०१६ | २०१६-२०१७ | २०१७-२०१८ |
|---|---|---|---|---|
| ०१. | स्मॉल इंण्डस्ट्रीअल बॉयलर | १०२ | ११७ | २२७ |
| ०२. | बाष्पक तपनक्षमता १ चौरस मिटरच्या पुढे व १००० चौरस मिटरच्या आंत. | ३२०९ | ३२५० | २९४३ |
| ०३. | बाष्पक तपनक्षमता १००० चौरस मिटरपेक्षा अधिक. | ४९८ | ५०६ | १००३ |
| | **एकूण** | **३८०९** | **३८७३** | **४१७३** |

- खाली नमुद केलेल्या कारणाकरीता बारा महिन्यापेक्षा कमी मुदतीसाठी एकूण ११८ बाष्पकांना अल्प मुदतीची प्रमाणपत्रे देण्यात आली.

| अ.क्र. | कारण | बाष्पकांची संख्या |
|---|---|---|
| अ) | बाष्पकांच्या स्थितीमुळे | ३६ |
| ब) | सामुहिक निरीक्षणाकरीता | ०१ |
| क) | मालकांच्या इच्छेनुसार | ८१ |
| **एकूण** | | **११८** |

- अहवालांकित वर्षाच्या कालावधीत महाराष्ट्र बाष्पक नियम, १९६२ मधील नियम ३८ अन्वये ५५ प्रमाणपत्राच्या नक्कल प्रती देण्यात आल्या.

- बाष्पक चालू असताना त्यास हानी पोहचल्याचे दिसून आल्याने अधिनियम, कलम ११ पोटकलम (ब) अन्वये ०६ बाष्पकांची प्रमाणपत्रे काढून घेण्यात आली.

- महाराष्ट्र बाष्पक नियम, १९६२ मधील नियम ४१ अन्वये ०७ प्रकरणांत दुसरी फी आकारण्यांत आली.

- तसेच अधिनियम १४(२) अन्वये नियुक्त केलेल्या तारखेस मालकांनी बाष्पक विहित निरीक्षणासाठी तयार न ठेवल्यामुळे भेटी निष्फळ ठरल्या असे अहवालांकित वर्षात एकूण ३ प्रकरणे घडली आहेत. सबबी अशा तीनही प्रकरणांत नव्याने फी आकारण्यांत आली आहे.

- कंपनीच्या उत्पादनावर परिणाम होऊ नये म्हणून बाष्पक मालकास जेव्हा त्यांचे बाष्पकाचे निरीक्षण तातडीने करुन घेणे आवश्यक वाटते, तेव्हा त्यांचे खास विनंतीवरुन महाराष्ट्र बाष्पक नियम, १९६२ मधील नियम १६ अन्वये विशेष भेटीचे आयोजन करण्यांत येते.

चालू वर्षी रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी किंवा सुर्यास्तानंतर एकूण १९८ निरीक्षणे अतिरिक्त फी आकारुन करण्यांत आली.

• चालू वर्षाच्या कालावधीत व मागील २ वर्षात एकूण केलेली निरीक्षणे, जलदाब चाचणी वगैरे बाबतची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| सन | पूर्ण अंतर्गत व बाहय निरीक्षण | स्तंभ (२) साठी पुढील निरीक्षणे ज्यासाठी अतिरिक्त फी आकारण्यांत आली नाही | गळती निरीक्षण | दुरुस्ती अंतर्गत निरीक्षण | जलदाब चाचणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| २०१५-२०१६ | ३९३३ | ३५३ | ७९ | ५९५ | ३८०९ |
| २०१६-२०१७ | ४०७१ | ३२१ | १२१ | ५६५ | ३९४८ |
| २०१७-२०१८ | ४२९६ | ३०० | १०७ | ६२४ | ४०९९ |

## १० नैमित्तिक बाहय निरीक्षण व नवीन बाष्पकांची नोंदणी बाष्पदाब चाचणी

| सन | नैमित्तिक बाहय निरीक्षण | बाष्पकांची बाष्पदाब चांचणी |
|---|---|---|
| २०१५-२०१६ | २४० | १६७ |
| २०१६-२०१७ | १९८ | २०२ |
| २०१७-२०१८ | २३० | २१० |

वरील नैमित्तिक बाहय निरीक्षणे या शिर्षाखाली अधिकाऱ्यांनी निरनिराळया मिल्स, कंपनी वगैरेना भेटी देऊन तेथील चालू किंवा बंद स्थितीत तपासणी केलेल्या बाष्पकांची आकडेवारी दिलेली आहे. तसेच बाष्पक अधिनियम व त्याखालील नियमांच्या तरतुदीनुसार बाष्पके चालतात किंवा नाही हे पाहण्यासाठी दिलेल्या भेटीचा अंतर्भाव केलेला आहे.

• अहवाल कालावधीत बंद असलेली १६२६ बाष्पके आहेत. निरीक्षण अधिकारी अशा बाष्पकांना विभागातील निरीक्षणाच्या वेळी नैमित्तिक भेटी देऊन ती बंद आहेत याची खात्री करुन घेतात. व त्याची नोंद घेण्यांत येते.

• नविन बाष्पकांच्या सेफ्टी व्हॉल्वची मान्यताप्राप्त वापरदाबावर सेटींग करण्यासाठी किंवा एखादया बाष्पकाचे सेफ्टी व्हॉल्व काही कारणास्तव बदली केल्यास बदललेले सेफ्टी व्हॉल्व सेट करण्यासाठी,बाष्पकांची बाष्पदाब चाचणी घेण्याकरीता भेट देण्यांत येते.

## ११ मितीपयोजकांचे नोंदणी निरीक्षण व नियतकालिक निरीक्षण.

चालू अहवाल कालावधीत एकूण ०५ नविन मितीपयोजकांचे नोंदणी निरीक्षण करण्यांत आले. तसेच ११२ मितीपयोजकांचे निरीक्षण करुन यापैकी १०३ मितिपयोजकांची जलदाब चाचणी घेतली व १०३ प्रमाणपत्रांचे नुतणीकरण करण्यांत आले. अहवाल कालावधीत बंद असलेली २१६ मितीपयोजके आहेत.

## १२ स्टीम, फीड व ब्लो डाऊन नलिकांचे निरीक्षण.

बाष्पक/मितीपयोजकांच्या निरीक्षणाशिवाय बाष्पक आणि मितीपयोजक यांच्या वापरात येणा-या स्टीम,फीड व ब्लो डाऊन नलिका व टयुबचे निरीक्षणही केले जाते. या निरीक्षणासाठी दिलेल्या भेटीचा तपशिल खालील तक्त्यांत दिला आहे.

| सन | एकूण भेटी | नविन बाष्प नलिकांचे / निरीक्षणे | वेल्ड प्रिपरेशन निरीक्षण | जलदाब चांचणी नलिकांची | १०० मिमि पर्यंत व्यासाच्या लांबी (मिटर्समध्ये) | १००मिमि पेक्षा जास्त लांबी (मिटर्समध्ये) |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१५-२०१६ | २९६८ | ११८२ | ९६२ | ८२४ | १०१६२९ | ४४१६३ |
| २०१६-२०१७ | २२३२ | ७९६ | ७६५ | ६७१ | ५००३२ | ५७१६७ |
| २०१७-२०१८ | २८४६ | १०१० | ९२३ | ९१३ | ७६८७४ | १९३१३ |

### १३ बाष्पक निर्मिती :-

निर्मितीखाली असलेल्या बाष्पकांचे निरीक्षण करणे व ते प्रमाणित करणे हे या संचालनालयाच्या कामाचे महत्वाचे अंग आहे.

बाष्पकांच्या निरीक्षणासाठी संचालनालयातील अधिका-यांनी दिलेल्या भेटीची संख्या, निरीक्षण केलेल्या बाष्पकांची संख्या वगैरेचा या वर्षाचा व मागील दोन वर्षाचा तपशिल पुढील तक्त्यात दर्शविला आहे.

| सन | निरीक्षणासाठी दिलेल्या भेटीची संख्या | निर्मिती केलेल्या बाष्पक, मितीपयोजक, प्रेशर पार्टसची संख्या |
|---|---|---|
| २०१५-२०१६ | ६३९० | ११३५ बाष्पके<br>५८ लघु औद्योगिक बाष्पके<br>३० मितीपयोजके<br>२०२६ हिटएक्सचेंजर व प्रेशर व्हेसल्स |
| २०१६-२०१७ | ५६८० | ११३६ बाष्पके<br>८६ लघु औद्योगिक बाष्पके<br>२० मितीपयोजके<br>१९८२ हिटएक्सचेंजर व प्रेशर व्हेसल्स |
| २०१७-२०१८ | ४७०५ | १२८७ बाष्पके<br>८४ लघु औद्योगिक बाष्पके<br>५८ मितीपयोजके<br>३१७९ हिटएक्सचेंजर व प्रेशर व्हेसल्स व प्रेशर पार्टस |

### १४ माऊंटिंग्ज, फिटिंग्ज इत्यादीची माहिती.

विनियमाप्रमाणे राज्यातील विविध कंपन्यांनी निर्मिती केलेल्या बाष्पक माऊटिंग्ज आणि फिंटीगचे निरीक्षण करण्याचे काम देखील या संचालनालयावर सोपविण्यात आलेले आहे.

खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे निरनिराळया आकाराचे साहित्य निरीक्षण करुन प्रमाणित करण्यात आलेले आहे. यासाठी देण्यात आलेल्या भेटीची संख्या, निरीक्षण करुन प्रमाणित केलेल्या निरनिराळया आकारमानाच्या भागांची संख्या तपशिलवार दिली आहे.

### १५ माऊंटिंग/फिटिंग्ज आकारमान मि. मि. मध्ये

| वर्ष | निरीक्षणा साठी भेटी | २५ मिमि पर्यन्त. | २५मिमि पेक्षा जास्त ५० मिमि पर्यन्त | ५०मिमि पेक्षा जास्त १०० मिमि पर्यन्त | १००मिमि पेक्षा जास्त १५० मिमि पर्यन्त | १५०मिमि पेक्षा जास्त २५० मिमि पर्यन्त | २५०मिमि पेक्षा जास्त | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१५-१६ | १७७८ | ३३०६१३ | १०६६१४ | ४७६११ | १३८३६ | १२५३६ | ४१९८ | ५१५४०६ |
| २०१६-१७ | १९३२ | ३५६१४६ | ११३८८२ | ४८७६३ | १३६७९ | १३०३१ | ३०२३ | ५४८५२४ |
| २०१७-१८ | १७५३ | ३२३३७४ | १०७४९६ | ४२८४७ | १३४४० | १२५०२ | ३७७५ | ५०३४३४ |

### १६ बाष्पक परिचर व बाष्पक परिचालन अभियंता परीक्षा

अहवाल कालावधीत बाष्पक परिचर यांना प्रमाणपत्रे देण्यासाठी १ परीक्षा मुंबई व १ परीक्षा नागपूर येथे घेण्यांत आली. सदर परीक्षांना बसलेल्या आणि उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची संख्या खालील प्रमाणे आहे.

| वर्ग | परीक्षेस बसलेल्या उमेदवारांची संख्या | परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची संख्या | उत्तीर्ण प्रमाण % |
|---|---|---|---|
| प्रथम वर्ग मुंबई | ३३५ | १८८ | ५६.१२% |
| नागपूर | १२३ | ९३ | ७५.६१% |
| व्दितीय वर्ग मुंबई | ४०२ | २३४ | ५८.२१% |
| नागपूर | ९१ | ६८ | ७४.७२% |

अहवाल कालावधीत बाष्पक परिचालन अभियंता यांना प्रमाणपत्रे देण्यासाठी १ परीक्षा मुंबई येथे घेण्यांत आली. सदर परीक्षेला बसलेल्या आणि उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची संख्या खालील प्रमाणे आहे.

| वर्ग | परीक्षेस बसलेल्या उमेदवारांची संख्या | परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची संख्या | उत्तीर्ण प्रमाण % |
|---|---|---|---|
| बाष्पक परिचालन अभियंता | ३३० | १२४ | ३७.५८% |

अहवाल वर्षात भारतीय बाष्पके विनियम, १९५० नुसार सांध्यात्यांना (वेल्डर्स) प्रमाणपत्र देण्यासाठी त्यांची चाचणी घेण्यात आली. उत्तीर्ण झालेल्या ११ उमेदवारांस प्रमाणपत्रे देण्यात आली.

- बाष्पके अधिनियम, १९२३ मधील कलम ३४ च्या अनुषंगाने खाली नमूद केलेल्या बाष्पकांना त्यांच्यासमोर दर्शविलेल्या कालावधीसाठी कलम ६ (क) च्या तरतुदीपासून सूट देण्यांत आली.

| क्रमांक | कंपनीचे नांव | बाष्पके क्रमांक | सूट मंजूर केलेला कालावधी |
|---|---|---|---|
| १ | मे.राष्ट्रिय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स, थळ, ता.अलिबाग, जि.रायगड | एमआर/११०३९ | २८/०४/२०१७ ते ३१/१२/२०१७ (आठ महिने व तीस दिवस) |
| २ | मे.राष्ट्रिय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स, थळ, ता. अलिबाग, जि.रायगड | एमआर/११०६० | ०७/०७/२०१७ ते ०६/०१/२०१८ (सहा महिने) |

## १७ जमा व खर्चाचे विवरण पत्र.

या संचालनालयाचा एकूण जमा होणारा महसूल तसेच योजनेतर व योजनांतर्गत खर्च खालील प्रमाणे आहे.

**महालेखापाल कार्यालयाच्या नोंदीशी केलेल्या पडताळणी प्रमाणे.**

| वर्ग | जमा महसूल रुपये | रुपये योजनेतर खर्च रुपये | योजनांतर्गत खर्च रुपये | जमेच्या तुलनेत होणारी वाढ खर्च ( टक्केवारी मध्ये) |
|---|---|---|---|---|
| २०१५-१६ | १०,५०,९५,६६९ | ५,२१,३१,३८९ | २१,७१,६८९ | ५१.६७% |
| २०१६-१७ | ११,८४,०१,७६८ | ५,६४,८०,३७३ | १८,५२,९३६ | ४९.२६% |
| २०१७-१८ | १२,०२,९१,०८३ | ६,६३,१६,००० | १४,६३,४८६ | ५६.३४% |

## १८ अपघात.

**बाष्पके अधिनियम १९२३ मधील कलम २(अ) प्रमाणे.**

"अपघात" म्हणजे बाष्पकाचा किंवा बाष्पनलिकेचा स्फोट किंवा बाष्पक वा बाष्पनलीका यांची कुवत कमी होऊन किंवा त्यामधून प्रमाणा बाहेर पाणी किंवा वाफेची गळती होऊन ज्यामुळे त्यात स्फोट होऊन मनुष्यहानी किंवा मालमत्तेचे नुकसान होण्याची शक्यता निर्माण होईल अशा स्वरुपाचे कोणतेही बाष्पकाचे किंवा बाष्पनलिकेचे झालेले नुकसान.

| वर्षे | अपघात | जिवित हानी (मृत व्यक्तींची संख्या) | दुखापत/भाजलेल्या व्यक्तींची संख्या |
|---|---|---|---|
| २०१५-२०१६ | ०५ | ०२ | १३ |
| २०१६-२०१७ | ०२ | ०३ | ०५ |
| २०१७-२०१८ | ०२ | ०० | ०० |

सन २०१७-२०१८ या वर्षाच्या कालावधीत एकूण ०२ बाष्पकास अपघात झाला. अपघातांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

**१. मे.जय हनुमान मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस, मु.पो.निमगावजाळी, ता.संगमनेर, जि.अहमदनगर**

या कारखान्याच्या बाष्पक क्रमांक एमआर/एस-१६२३६ अपघात झाला. असूचित अपघाताचे कारण शोधणेकरिता श्री.उमेश न. पाटील, सहसंचालक, बाष्पके, महाराष्ट राज्य, पुणे यांनी भेट दिली. त्यांनी केलेल्या प्राथमिक चौकशीमध्ये असे आढळून आले की, उपरोक्त बाष्पकाच्या फर्नेसला दोन ठिकाणी फुगवटे आले. सर्व स्मोक टयुब वाकलेल्या स्थितीत आढळुन आल्या, तसेच टयुब होल्स हया अंडाकार झाल्याचे दिसून आले. त्याअनुषंगाने संपुर्ण फर्नेस, सर्व स्मोक टयुब, तसेच रिअर एण्ड टयुब प्लेट बदलण्याबाबत कंपनीला सूचित करण्यात आले. सदर अपघातात मनुष्यहानी झाली नाही.

**२. मे.यशराज इंडस्ट्रिज, प्लॉट नं.७, डी-८८, सुपा पारनेर एमआयडीसी, ता.पारनेर, जि.अहमदनगर-४१४ ३०१**

या कारखान्याच्या बाष्पक क्रमांक एमआर/एस-१६८२८ ला दिनांक २७/०१/२०१८ रोजी अपघात झाला. अपघाताचे कारण शोधणेसाठी श्री.उमेश न. पाटील, सहसंचालक, बाष्पके, महाराष्ट राज्य, अहमदनगर यांनी दिनांक ०५/०२/२०१८ रोजी सदर कारखान्याला भेट दिली. त्यांनी केलेल्या प्राथमिक चौकशीमध्ये असे आढळून आले की, सदर बाष्पकाच्या फर्नेसला दोन ठिकाणी फुगवटे आले. तसेच स्मोक टयुब वाकलेल्या दिसून आल्या. त्याअनुषंगाने संपुर्ण फर्नेस बदलण्याबाबत, तसेच वाकलेल्या स्मोक टयुब काढुन टाकण्याबाबत कंपनीला सूचित करण्यात आले.
**सदर अपघातात मनुष्यहानी झाली नाही.**

## १९ विशेष बाबी

**बाष्पके संचालनालयाचे बळकटीकरण व अधिनियमांची प्रभावी अंमलबजावणी.**

दत्तमत ( २२३० ५७८४ ) योजनांतर्गत सन् २०१७-१८ या आर्थिक वर्षात शासकीय जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यांत आले.

बाष्पकाचे मालक, बाष्पक नैपुण्य अभियंता, बाष्पक परिचर व सांधाते व बाष्पक रासायनिक स्वच्छता करणारे कंत्राटदार यांचे लक्ष संशोधित कायदयाकडे आकर्षून घेणे आवश्यक ठरते.तसेच कार्यक्रमाचा मूळ हेतू बाष्पक सुरक्षितरित्या कसे चालवावे,काळजी कशी घ्यावी, अपघातापासून बाष्पकाला कसे वाचवावे, बाष्पक कायदा व नियम अशा विविध पैलूंवर प्रकाश टाकण्यात आला व असे अनेक विषयांवर व्याख्यान देण्यांकरिता उद्योग व शैक्षणिक क्षेत्रातील विविध विषयांच्या तज्ञांना आमंत्रित करण्यांत आले.

सदर चर्चासत्राव्दारे अपघात होऊ नये याकरीता सर्व लोकांपर्यंत माहिती पोहचविण्यास मदत होते. सद्यपरिस्थतीत काजू युनिटमध्ये ब्रिकेट, पेपर मिल मध्ये ज्वालाग्राही भूसा, तांदळाचा कोंडा इत्यादिंचा वापर इंधन म्हणून केला जातो. यापैकी ब-याच वेळा अतिज्वलनामुळे कामगार भाजलेले आहेत. याकरीता त्यांचे ज्ञान वेळोवेळी अद्यावत करणे आवश्यक असते.

**बाष्पकांचा सुरक्षित व कार्यक्षम वापर या विषयावर खालील विभांगामध्ये आयोजित करण्यांत आलेल्या कार्यशाळा.**

| चर्चासत्राचे ठिकाण | चर्चासत्राचा दिनांक | उपस्थित असलेले अभियंते | | उपस्थित असलेले बाष्पक परिचर | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | संचलन व सुव्यवस्था अभियंते | उभारणी व निर्मिती या आस्थापनातील अभियंते | प्रथम श्रेणी बाष्पक परिचर | व्दितीय श्रेणी बाष्पक परिचर | |
| सोलापूर विभागीय कार्यालय | २२/०७/२०१७ व २३/०७/२०१७ | १६५ | ६० | ७९ | १०० | ४०४ |
| अहमदनगर विभागीय कार्यालय | २५/११/२०१७ व २६/११/२०१७ | १६० | ५८ | ८० | १३२ | ४३० |

कार्यशाळेत तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे उपस्थित राहणाऱ्या इंजिनिअर्स व बाष्पक परिचर यांनी चर्चासत्राचा लाभ घेतला.सदर कार्यक्रम ज्या उद्देशाकरीता आयोजित करण्यांत आला होता तो यशस्वीरीत्या साध्य करण्यांत आला आहे.

## २० महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-२०१५ अंतर्गत ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यांत आलेल्या लोकसेवा

दिनांक २६/०१/२०१६ पासून दोन सेवा, तसेच दि.२९/६/२०१६ पासून आणखी दोन सेवा या कार्यालयामार्फत ऑनलाईन उपलब्ध करुन देण्यांत आलेल्या होत्या. त्याच प्रमाणे दि.२०/६/२०१७ पासून आणखी अठरा सेवा वरील अधिनियमांतर्गत ऑनलाईन उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्याचा विहित कालावधी,पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व दिव्तीय अपिलीय अधिकारी खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | लोकसेवेचा तपशिल | लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | मालकी हक्काचे हस्तांतरण | ७ दिवस | तांत्रिक/निरीक्षण शाखेचा तांत्रिक अधिकारी/अधीक्षक | सहसंचालक, बाष्पके,मुंबई/ प्रादेशिक कार्यालये | संचालक, बाष्पक संचालनालय, मुंबई |
| ०२ | प्रमाणपत्राची नक्कल प्रत | ७ दिवस | तांत्रिक/निरीक्षण शाखेचा तांत्रिक अधिकारी/अधीक्षक | सहसंचालक, बाष्पके,मुंबई/ प्रादेशिक कार्यालये | संचालक, बाष्पक संचालनालय, मुंबई |
| ०३ | बाष्पके व मितीपायोजकांची नोंदणी<br>अ) महाराष्ट्र राज्यात निर्मित<br>आ) महाराष्ट्र राज्याबाहेर निर्मित | ४३ दिवस<br>५० दिवस | संबंधित क्षेत्रिय कार्यालयाचे सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई | संचालक, बाष्पक संचालनालय, मुंबई |
| ०४ | बाष्पके व मितीपायोजकांच्या प्रमाणपत्राचे नूतणीकरण | १७ दिवस | संबंधित क्षेत्रिय कार्यालयाचे सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई | संचालक, बाष्पक संचालनालय, मुंबई |
| ०५ | बाष्पके निर्मात्यांना मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालननालय, मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| ०६ | बाष्पके निर्मात्यांच्या मान्यतेचे नूतणीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालननालय, मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| ०७ | बाष्पके/ मितिपयोजके उभारणीची मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालननालय, मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |

| अ.क्र. | लोकसेवेचा तपशिल | लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| ०८ | बाष्पके/ मितिपयोजके उभारणीच्या मान्यतेचे नूतणीकरण | २३ दिवस | तांत्रिक/निरीक्षण शाखेचा तांत्रिक अधिकारी/अधीक्षक | सहसंचालक, बाष्पके,मुंबई/ प्रादेशिक कार्यालये | संचालक, बाष्पक संचालनालय, मुंबई |
| ०९ | मितिपयोजके निर्मात्यांना मान्यता | २३ दिवस | तांत्रिक/निरीक्षण शाखेचा तांत्रिक अधिकारी/अधीक्षक | सहसंचालक, बाष्पके,मुंबई/ प्रादेशिक कार्यालये | संचालक, बाष्पक संचालनालय, मुंबई |
| १० | मितिपयोजके निर्मात्यांच्या मान्यतेचे नूतणीकरण | २३ दिवस | संबंधित क्षेत्रिय कार्यालयाचे सक्षमप्राधिकृत निरीक्षणअधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई | संचालक, बाष्पक संचालनालय, मुंबई |
| ११ | प्रेशर व्हेसेल्स निर्मात्यांना मान्यता | २३ दिवस | संबंधित क्षेत्रिय कार्यालयाचे सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई | संचालक, बाष्पक संचालनालय, मुंबई |
| १२ | प्रेशर व्हेसेल्स निर्मात्यांच्या मान्यतेचे नूतणीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालननालय, मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| १३ | प्रेशर पार्टस निर्मात्यांना मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालननालय, मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| १४ | प्रेशर पार्टस निर्मात्यांच्या मान्यतेचे नूतणीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालननालय, मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |

| अ.क्र. | लोकसेवेचा तपशिल | लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १५ | हिट एक्सचेंजर निर्मात्यांना मान्यता | २३ दिवस | तांत्रिक/निरीक्षण शाखेचा तांत्रिक अधिकारी/अधीक्षक | सहसंचालक, बाष्पके,मुंबई/ प्रादेशिक कार्यालये | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| १६ | हिट एक्सचेंजर निर्मात्यांच्या मान्यतेचे नूतणीकरण | २३ दिवस | तांत्रिक/निरीक्षण शाखेचा तांत्रिक अधिकारी/अधीक्षक | सहसंचालक, बाष्पके,मुंबई/ प्रादेशिक कार्यालये | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| १७ | स्मॉल इंडस्ट्रियल बाष्पके निर्मात्यांना मान्यता | २३ दिवस | संबंधित क्षेत्रिय कार्यालयाचे सक्षमप्राधिकृत निरीक्षणअधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई | संचालक, बाष्पक संचालनालय, मुंबई |
| १८ | स्मॉल इंडस्ट्रियल बाष्पके निर्मात्यांच्या मान्यतेचे नूतणीकरण | २३ दिवस | संबंधित क्षेत्रिय कार्यालयाचे सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालननालय, मुंबई | संचालक, बाष्पक संचालनालय, मुंबई |
| १९ | बाष्पके व मितिपयोजक दुरुस्तीकारांना मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालननालय, मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| २० | बाष्पके व मितिपयोजक दुरुस्तीकारांच्या मान्यतेचे नूतणीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालननालय, मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| २१ | पाईप फॅब्रिकेटर म्हणून मान्यता | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालननालय, मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |
| २२ | पाईप फॅब्रिकेटर म्हणून मान्यतेचे नूतणीकरण | २३ दिवस | सक्षम प्राधिकृत निरीक्षण अधिकारी | सहसंचालक, बाष्पके संचालननालय, मुंबई | संचालक, बाष्पके संचालनालय, मुंबई |

**महाराष्ट्र शासनाच्या "मेक इन महाराष्ट्र" या योजनेअंतर्गत**

ईझ ऑफ डुईंग बिझिनेस साध्य करण्यांकरीता या संचालनालयाने बाष्पक वापरकर्त्यांसाठी खालील योजना उपलब्ध करुन दिल्या आहेत.

| योजनेचा प्रकार | योजनेचा उद्येश | दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरुप |
|---|---|---|
| ऐच्छिक | या योजनेकरीता सुरक्षेशी तडजोड न करता ज्या बाष्पके/मितोपयाजकाकरीता या योजनेचा पर्याय स्विकारण्यांत आलेला आहे त्या बाष्पके/ मितोपयोजकांची तपासणी करण्यांकरीता निरीक्षण अधिकारी व सक्षम व्यक्ती यांच्या भेटी कमी करणे. | सदर योजना पाच वर्षासाठी लागु असेल व पाच वर्षातून एकदाचत्यांचे निरीक्षण (Random Inspection) होईल व दरवर्षी योजनेत भाग घेतलेल्या कारखान्यापैकी २०% कारखान्यांचे पाच वर्षातून एकदाच निरीक्षण होईल. |

**१-स्वयं प्रमाणिकरण योजना (Self Certification Cum-Consolidated Annual Return Scheme)**

शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रं.-०४१५/प्र.क्रं.२३/कामगार-१, दिनांक २४/०६/२०१५ अन्वये १००० वर्ग मीटर तपनक्षमता व त्यापेक्षा अधिक तपनक्षमता असलेल्या बाष्पके / मितिपयोजकांसाठी या योजनेचा पर्याय उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

**२. त्रयस्थ आस्थापनांमार्फत निरीक्षण योजना (Third Party Inspection Scheme.)**

शासन निर्णय,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग क्रं.फएसी-२०१५/सीआर-३२७/ कामगार-४,दिनांक १७/०३/२०१६ अन्वये १००० वर्ग मीटर तपनक्षमता पेक्षा कमी तपनक्षमता असलेल्या बाष्पके / मितिपयोजकांसाठी या योजनेचा पर्याय उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

## २२ सन २०१७-१८ या वर्षामध्ये वृक्षारोपणाचा कार्यक्रम

महाराष्ट्र शासनाच्या वृक्षरोपणाच्या कार्यक्रमांतर्गत कामगार विभागास सन २०१७ ते २०१९ या ३ वर्षाच्या कालावधीमध्ये ५० कोटी वृक्ष लागवड, संगोपन आणि देखभाल या उद्दिष्टांसंदर्भात वर्षनिहाय नियोजन आराखडा व कृती कार्यक्रम तयार करुन अंमलबजावणी करण्याचे हया विभागाने योजिले आहे. हया विभागाच्या अंतर्गत असणाऱ्या सर्व विभागीय कार्यालयांनी सहभागी होऊन मोठया प्रमाणात सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचे ठरविले आहे. त्या अनुषंगाने त्यांनी आपल्या विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या खाजगी आस्थापनांना योग्यप्रकारे नियोजन करुन सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी ह्यासाठी लेखी सूचना केल्या आहेत.

## २३ बाष्पके संचालनालय एक दृष्टीक्षेप

- सन २०१७-२०१८ या वार्षिक अहवाल कालावधीत ४२९६ बाष्पकांची निरीक्षणे करण्यांत आली. त्यापैकी ४१७३ बाष्पकांना प्रमाणपत्रे देण्यांत आली.
- महाराष्ट्र राज्यात एकूण १२७८ बाष्पकांची निर्मिती झाली त्यापैकी २१८ बाष्पके महाराष्ट्र राज्यात विकली गेली, तसेच इतर राज्यात ९१२ बाष्पके व परदेशात ६२ बाष्पके विकली गेली. निर्मिती झालेली ९५ बाष्पके शिल्लक असून विक्रीसाठी प्रतिक्षेत आहेत. या संचालनालयाच्या अधिकाऱ्यांनी ४७०५ भेटी देऊन बाष्पक निमिर्तीस मोलाचे योगदान दिलेले आहे.
- साधारण दहा वर्षापूर्वी बाष्पक आणि त्याचे पार्ट व संयत्रे निर्मिती करणाऱ्या कारखान्यांची संख्या अत्यल्प होती व प्रतिवर्षी यात वाढ होत गेली. सद्यस्थितीत बाष्पके व त्याचे पार्टस, संयत्रे निर्मिती करणाऱ्या मान्यताप्राप्त कारखान्यांची

संख्या ३७३ इतकी आहे, तसेच इतर सेवा देणाऱ्या (जसे पाईप फॅब्रिकेटर्स, इरेक्टर्स, रिपेरर्स, टेस्टिंग लॅबोरेटरीज इत्यादी) मान्यताप्राप्त कारखान्यांची संख्या ४३८ इतकी आहे.

- राज्यात विजेचा तुटवडा अधिक जाणवू लागल्याने, उद्योग धंदयावर अनिष्ठ परिणाम होऊ लागला. अशा परिस्थितीत महाराष्ट्र राज्य वीज निमिर्ती कंपनी लिमिटेड, टाटा पॉवर कंपनी, मुंबई आणि रिलायन्स एनर्जी, डहाणू, यासारख्या विद्युत केंद्राना उपलब्ध इंधनाद्वारे महाराष्ट्र राज्याचा विद्युत पुरवठा अखंडीत चालू ठेवण्यासाठी त्यांची बाष्पके सतत चालू ठेवावी लागली. तसेच इंधन प्रक्रिया करण्यासाठी रिफायनरीज व खते निर्मितीसाठी फर्टिलायझर कंपन्या सुध्दा पुर्ण क्षमतेने व अखंडपणे कार्यान्वित राहणे गरजेचे आहे.

- मे. भारत पेट्रोलियम, लि., मे. हिन्दुस्तान पेट्रोलियम, लि., मे. राष्ट्रीय केमिकल्स ॲन्ड फर्टिलायझर्स लि.,या कंपन्यांनाही त्यांची बाष्पके सतत चालू ठेवावी लागली. या संचालनालयाने बहुतांशी बाष्पकांचे वेळेवर निरीक्षण करुन दिले. तसेच तेल कंपन्यांना आपली उत्पादनाची उद्दिष्टे साध्य करण्यास मदत झाली आणि राज्याची विद्युत पुरवठयातील तूट कमी करण्यास मदत झाली.

- महाराष्ट्र राज्यातील सहकारी चळवळ सहकारी साखर कारखान्यामुळे वाढली, फोफावली हे सर्वश्रुत आहे. त्यामुळे खेडयापाडयात लहान मोठे पुरक उद्योग उभे राहिले. सहकारी व खाजगी साखर कारखाने सक्षमरित्या पूर्ण ताकदीने चालविण्यासाठी सर्व प्रथम बाष्पकाची गरज असते. गळीत हंगाम सुरु होण्यापूर्वी बाष्पक निरीक्षण, बाष्पक दुरुस्ती, व जलदाब चाचणी इत्यादी महत्वपूर्ण कामे कारखान्यांना पूर्ण करावी लागतात. अर्थात या कामासाठी या संचालनालयाच्या निरीक्षण अधिकाऱ्यांच्या सहकार्याची आवश्यकता असते. सहकारी साखर कारखाने आर्थिक अडचणीत असताना गळीत हंगाम वेळेवर सुरु करण्यासाठी या संचालनालयाच्या निरीक्षण अधिकाऱ्यांनी बाष्पक निरीक्षणे वेळेवर करणे आवश्यक होते. या संचालनालयाच्या निरीक्षण अधिकाऱ्यांनी योग्य नियोजन करून सर्वच्या सर्व साखर कारखान्यांतील बाष्पकांची त्यांच्या वेळेच्या मागणीनुसार वेळेवर निरीक्षणे पार पाडली. त्यामुळे साखर कारखान्यांना जास्तीत जास्त ऊसाचे गाळप करता आले.

- बाष्पक निरीक्षण अधिकाऱ्यांनी स्थापीत कारखान्यांना वेळोवेळी नियोजनपूर्वक निरीक्षण भेटी दिल्याने त्यांची उद्दिष्टे पूर्ण होऊ शकली व परिणामी या विभागाचा महाराष्ट्रात नवीन कारखाने निर्मितीमध्ये व राज्याच्या औद्योगिक प्रगतीस हातभार लागला व रोजगार निर्मितीत वाढ झाली.

- अस्तित्वात असलेल्या व नवनिर्मित बाष्पकांचे/मितोपयोजकाचे निरीक्षण, बाष्पनलीका, टयूब्स व माऊटिंग/फिटिंग्ज इत्यादी बाष्पकाच्या सुटया भागांचे निरीक्षण, बाष्पदाब चाचणी असा निरीक्षणाचा मोठया प्रमाणावर असलेला वार्षिक निरीक्षण कार्यक्रम या संचालनतील सर्व अधिकाऱ्यानी निरीक्षण अधिकाऱ्यांची, सहाय्यक कर्मचाऱ्यांची संख्या अत्यंत अपूरी असतांना देखील अनेक अडचणीतून मार्ग काढीत पार पाडला.

(ध. प्र. अंतापूरकर)
प्रभारी संचालक,
बाष्पके, महाराष्ट्र राज्य,मुंबई.